जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस.

THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेसनोट क्रमांक :— दिनांक ०२/०९/२०२५

'' स्वत:चे पत्नीचा निर्घुणपणे गळा कापुन खुन करून पुरावा नष्ट करणाऱ्या आरोपीतास भोईवाडा पोलीस ठाणे, भिवंडी च्या पोलीसांनी ठोकल्या बेडया.''

.....०००००.....

दिनांक ३०/०८/२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजताचे सुमारास भोईवाडा पोलीस ठाणेतील ठाणे अंमलदार पोउनि/ रविंद्र पाटील यांना ईदगा रोड, झोपडपटटी, स्लॉटर हाऊस येथील घर नं ७०४ शेजारील खाडीमध्ये एक मानवी जातीचे मुंडके दिसुन येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर भोईवाडा पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी तसेच मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, भिवंडी व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पश्चिम विभाग, भिवंडी यांनी सदर ठिकाणी भेट देवुन सदरबाबत खात्री केली असता, एक अनोळखी अंदाजे वय २५ ते ३० वर्ष, केस लांब काळे, नाक बसके, नाकात डाव्या नाकपुडीमध्ये पिवळया धातुची चमकी, दोन्ही कानामध्ये पिवळया धातुचा दागिना या प्रमाणे वर्णनाचे महिलेस कोणत्या तरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून कोणत्यातरी धारदार शस्त्राने जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने तिचे मुंडके कापुन तिला जीवे ठार मारले व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने सदरचे मुंडके खाडीमध्ये फेकुन दिले म्हणुन त्याबाबत भोईवाडा पोलीस ठाणे, भिवंडी तात्काळ गुन्हा नोंद क्रमांक ५९९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), २३८ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

सदरचा गुन्हा दाखल होताच मा. सपोआ, पश्चिम विभाग, भिवंडी तसेच मा. पोउआ, परिमंडळ — २, भिवंडी यांनी प्रत्यक्ष पोलीस ठाणेस भेट देवून गुन्हयाचे तपासाबाबत मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे भोईवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अशोक रत्नपारखी व गुन्हयाचे तपास अधिकारी पोनि/ प्रमोद कुंभार यांनी तात्काळ दोन तपास पथके स्थापन करुन नमुद गुन्हयात मयत महिलेचे फक्त मुंडके मिळाले असून उर्वरित धडाचा शोध आजुबाजुच्या परिसरात घेतला असता, काही उपयुक्त माहिती मिळून आली नाही.

नमुद गुन्हयाचे तपासात नमुद अनोळखी महिला हिची ओळख पटविण्यात यश आले व नमुद मयत महिलेच्या आईने मयत महिला ही तिची मुलगी नामे परवीन उर्फ मुस्कान मोहम्मद तहा अन्सारी असल्याचे ओळखले. नमुद मयत महिलेंचा जावई नामे मोहम्मद तहा उर्फ सोनु इम्तीयाज अहमद अन्सारी, वय २५ वर्षे, राह. इदगाह रोड झोपडपट्टी, बंद पडलेल्या स्लॅटर हाऊस जवळ, ता. भिवंडी, जि. ठाणे यास ताब्यात घेवून केलेल्या सखोल तपासामध्ये त्याने गुन्हयाची कबुली दिली असून नमुद आरोपीतास अटक करून मा. न्यायालयात रिमांडकामी हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास दिनांक ११/०९/२०२५ रोजीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. नमुद गुन्हा उघडकीस आलेला असुन गुन्हयातील मयत महिलेचे धड आरोपीताने इदगाह येथील खाडीत टाकले असल्याचे सांगत असुन त्याचा शोध सुरू आहे. तसेच नमुद गुन्हयाचा अधिक तपास करीत आहोत.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ — २ भिवंडी श्री शशिकांत बोराटे व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, पश्चिम विभाग, भिवंडी श्री विजय मराठे यांचे मार्गदर्शनाखाली भोईवाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अशोक रत्नपारखी, पोनि/ श्री प्रमोद कुंभार, सपोनि/ नवनाथ रूपवते, सपोनि/ शिवाजी पाटील, पोउपनि/ रविंद्र पाटील, पोहवा/ ६६२० सावळे, पोना/ ७१५६ धायगुडे, पोशि/ ७७२७ आलापुरे, पोशि/ ४२७६ सपकाळे, पोशि/ १९६५ पालवी, पोशि/ ८४१७ घुगे, पोशि/ ३५४६ थोरात, पोशि/ ३८७६ पवार यांनी केलेली आहे.


पोलीस आयुक्तालय ठाणे शहर
परिमंडळ २, भिवंडी
भोईवाडा पोलीस ठाणे, भिवंडी
"स्वागत कक्ष"
पोलीस आयुक्तालय